**सुधारित वाण :- फुले ज्योती**



**लागवडीची वेळ :-** खरीप जून-जुलै

**बियाण्याचे प्रमाण :-** १.० ते १.२५ किलो प्रति हेक्टरी. रोपवाटिकेत रोप तयार करावीत ( ४० ते ४५ दिवसांत )

**लागवडीचे अंतर :-** खरीप : ६० * ४५ सेमी.

**खतांची मात्रा :-** १०० : ५० : ५० नत्र : स्फुरद : पालाश किलो/हेक्टर.

**अंतरमशागत :-** १५ ते २० दिवसांच्या अंतराने नियमित खुरपणी करणे. लागवडीपासून १ महिन्याने वरखताच्या मात्रा द्याव्यात.

**एकात्मिक अन्नद्रव्य :- अ) सेंद्रिय खते :-** २० ते २५ टन शेणखत/हेक्टर

**व्यवस्थापन :- ब) जीवाणू खते :-** स्फुरद विरघळणारे जीवाणू २५ ग्रॅम/किलो बियाण्यास चोळावे.

**खते देण्याची वेळ :-** १) सेंद्रिय खते लागवडीपूर्वी १५ दिवस अगोदर द्यावे.

२) रासायनिक खते १०० : ५० : ५० नत्र : स्फुरद : पालाश/हेक्टरी, अर्धे नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश पेरणीच्या वेळी द्यावी व उर्वरित ५० किलो नत्र २ समान हप्त्यात विभागून ३० व ४५ दिवसांनी द्यावे

३) जीवाणू खते बियाण्यास पेरणीपूर्वी चोळावे.

४) बियाण्यास ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी.

**आंतरमशागत :-** १५ ते २० दिवसांच्या अंतराने नियमित खुरपणी करणे. फुले येण्याच्या सुमारास झाडांना भर लावावी म्हणजे झाडे कोलमडणार नाहीत.

**कीड व रोग**

**१) फुलकिड :-**




फुलकिड हे पानाच्या खालच्या बाजूस राहतात आणि पानातील रस शोषून घेतात त्यामुळे पानाच्या कडावरील बाजूस वळतात पाने लहान होतात यालाच बोकड्या किंवा चुराडा-मुरडा असे म्हणतात. ह्या किडीचे प्रमाण कोरड्या हवामानात ज्यास्त आढळते त्याच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० ईसी १५ मिली. किंवा इमीडॅक्लोप्रीड १७.८ एस.एल. ५ मिली किंवा फिप्रोनील ५ एस.सी. १५ मिली. ह्या कीटकनाशका च्या आलटून पालटून फवारण्य कराव्यात. फवारणी करतांना पावसाळी वातावरणामध्ये चिकट द्रव्याचा (०.१ %)वापर जरूर करावा.

**२) कोळी :-**



मिरची पिकावर कोळी आढळल्यास फेनप्रोपॅथ्रीन ३० ईसी. ५ मिली. किंवा फेनॅक्झाकीन १० ई.सी. २५ मिली. १० लिटर पाण्यातून फवारावे.

**३) फळकुज आणि फांद्या वाळणे :-**



ह्या रोगाच्या प्रादुर्भावामुळे हिरव्या किंवा लाल मिरची फळांवर आणि पानावर वर्तुळाकार गोल डाग दिसतात. दमट हवेत रोगांचे जंतू वेगाने वाढतात आणि फळांवर काळपट चट्टे दिसतात. अशी फळे कुजतात, फांद्या वाळणे या रोगाची सुरवात शेंड्याकडून होते. प्रथम शेंडेमरतात. रोगाचा प्रादुर्भाव ज्यास्त झाल्यास झाडे सुकून वाळतात, तसेच पानांवर आणि फांद्यांवर काळे ठिपके दिसतात. हे रोग कोलेटोट्रिकम या बुरशीमुळे होतात. या रोगाची लक्षणे दिसताच शेंडे खोडून त्याचा नाश करावा तसेच मॅन्कोझेब किंवा कॉपर ऑक्सील्कोराईड या पैकी एक २५ ते ३० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून २-३ फवारण्या दर १५ दिवसांच्या अंतराने कराव्यात.

**४) भुरी रोग :-**



भुरी या रोगामुळे पानाच्या पृष्ठभागावर आणि खालच्या बाजूस पांढरी बुरशी दिसते. रोग जास्त बळावल्यास पाने गळून पडतात.

या रोगाचा प्रादुर्भाव दिसताच पाण्यात विरघळणारे गंधक ३० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून २ - ३ फवारण्या दर १५ दिवसांच्या अंतराने कराव्यात.

**४) चुरडा-मुरडा :-**



हा विषाणूजन्य रोग आहे. या रोगाचा प्रसार फुलकिडे, मावा आणि कोळी या रस शोषून घेणाऱ्या किडी मार्फत होतो, हे किडी पानातील अन्न रस शोषून घेतात. त्यामुळे पानाच्या शिरामधील भागावर सुरकुत्या पडून संपूर्ण पानांची वाढ खुंडते आणि झाड रोगट दिसते.

डायमेथोएट ३० ईसी. १५ मिली / १० लिटर पाण्यात दर १५ दिवसांनी ४ ते ५ फवारण्या कराव्यात. फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी फिप्रोनील ५ एस.सी. १५ मिली.आणि कोळीच्या नियंत्रणासाठी फेनाक्झाक्वीन १० ईसी. २५ मिली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.

**उत्पादन :- हिरवी मिरची :-** १०० ते २०० क्विंटल / हेक्टर.

**लाल वळलेली मिरची :-** १५ ते २० क्विंटल / हेक्टर.